विधान सभा
महाराष्ट्र
आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

पाठपुरावा/३०६/अश्लील/जाहीरात बंदी/२०११

स्मरणपत्र क्र. ४

दिनांक : १.६.२०११

जावक क्रमांक :

प्रती,

**मा. ना. आर. आर. पाटील**
गृहमंत्री
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई–३२.

सप्रेम नमस्कार,

विषयः प्रमुख लोकप्रिय वृत्तपत्रांमध्ये मसाज पार्लर, लैंगीक व्यवसायासंबंधीच्या प्रकाशित होणाऱ्या जाहीरातींवर तातडीने प्रतिबंध घालण्याबाबत.

संदर्भः १. माझी आपणास सादर पत्रे दिनांक १८.५.२०१०, दिनांक १२.६.२०१०, दिनांक ११.१.२०११, दिनांक २८.३.२०११

महोदय,

श्री. मनोज जयस्वाल अध्यक्ष भाजपा कायदे आघाडी वरळी विधानसभा मुंबई यांचे स्वयंस्पष्ट निवेदन उचित व अविलंब कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविले आहे. प्रमुख लोकप्रिय वृत्तपत्रांमध्ये मसाज पार्लर, लैंगीक व्यवसायासंबंधीच्या प्रकाशित होणाऱ्या जाहीरातींवर तातडीने प्रतिबंध घालण्याबाबत त्यांनी रास्त मागणी केली आहे. दि टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई मिरर, हिंदुस्थान टाईम्स, डिएनए, मिड–डे या प्रमुख लोकप्रिय वृत्तपत्रांमध्ये एस्कॉट एजन्सीज, मसाज पार्लर तसेच लैंगीक संबंधांच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या वेश्या व्यवसायासंबंधीच्या जाहीराती प्रसिद्ध होत आहे. अशा पद्धतीच्या जाहीरातींमुळे समाजातील सांस्कृतीक मुल्यांचा ऱ्हास होत आहे व त्या माध्यमातून सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. या सर्व बाबी लक्षात घेता दि इम्मोरल ट्राफीक ॲक्ट १९५६ च्या तरतूदींच्या अनुषंगाने यावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे. आपण डान्सबार बंदी सारखा ऐतिहासिक निर्णय घेवून महाराष्ट्रासमोर नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेला आपणाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. आपण याबाबत तातडीची कार्यवाही कराल याचा मला विश्वास आहे. पत्रासह वृत्तपत्रात प्रसिद्ध जाहीरातींचे दाखले जोडलेले आहे.

कृपया आपण जातीने लक्ष घालुन याबाबत त्वरीत योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती. कार्यवाहीची सविस्तर रुपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा.

आपला स्नेहांकित

सविनय धन्यवाद !

**(सुधीर मुनगंटीवार)**

प्रत माहितीस सादर :

श्री. मनोज जयस्वाल, १/६ म्युनिसिपल चाळ, डॉ. इ मोजेस रोड, वरळी मुंबई–४०० ०१८.



कार्यालय : सीडी.ओ. बॅरेक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई–४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर–४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com